**निशाणी क्रमांक ६१**

सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०५ ची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक कथन करतो की,

नाव : **अनुसया उल्हास मडावी,**

वय : ३८ वर्ष,

व्यवसाय : महिला पोलिस शिपाई नेमणुक अवधुतवाडी पोलीस स्टेशन यवतमाळ

राहणार : यवतमाळ.

**सरकारतर्फे सरकारी वकील श्रीमती. टि. बी. वैद्य यांच्या मार्फत सरतपास–**

१. दिनांक ३१/१२/२०१९ रोजी मी तुळजापुर पोलिस ठाणे येथे कार्यरत होते. सदर दिवशी गु. र. क्र. ४४५/२०१९ ची नोंद झाल्यानंतर सदर गुन्हाचा तपास माझ्याकडे देण्यात आला. तपासा दरम्यान मी घटनास्थळाचा पंचनामा पंचा समक्ष केला. मला आता अभिलेखावरील सदर घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्रमांक ६२** देण्यात येते. साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. घटनास्थळाचा नमुना आठ अ उतारा हस्तगत केला. मला आता सदर नमुना आठा अ चा उतारा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यास **निशाणी क्रमांक ६३** देण्यात येते. त्यानंतर आरोपींना अटक केली. फिर्यादीचे वैदयकिय प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपींनी फिर्यादीला मारहाण केल्याचे तपासा दरम्यान निष्पन्न झाल्यामुळे आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोप दाखल केले. मी आरोपींना पाहील्यास ओळखू शकते. साक्षीदाराने न्यायालयात उपस्थीत असलेल्या चार आरोपीकडे पाहुन आज रोजी एक आरोपी न्यायालयात उपस्थीत नसल्याचे सांगितले. इतर आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**निशाणी क्रमांक ६१**

**सरतपास पूर्ण.**

**उलट तपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. जे. एस. इंगळे यांच्या मार्फत–**

२. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे फिर्यादीचे घर आहे. फिर्यादीच्या घराचा नमुना आठ अ चा उतारा मी तपासा दरम्यान हस्तगत केला होता. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ६३ वरील आठ अ च्या उता–या व्यतिरिक्त इतर नमुना आठ अ चा उतारा मी सदर प्रकरणात हस्तगत केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनामा निशाणी क्रमांक ६२ मधील चतुःसिमा व निशाणी क्रमांक ६३ वरील चतुःसिमा वेगवेगळया आहेत. दिनांक २७/१२/२०१९ ते ३१/१२/२०१९ दरम्यान फिर्यादी ही उपचारा निमित्त दवाखान्यात भरती असल्याबाबत मी तपास केला नाही. दिनांक ३१/१२/२०१९ रोजी फिर्यादीस दवाखान्यात सुट्टी मिळाली त्याबाबत कागदोपत्री पुरावा हस्तगत केला नाही. फिर्यादमध्ये नमुद दिनांक २७/१२/२०१९ रोजीच्या घटनेबाबत मी तपास केला नाही. फिर्यादमध्ये नमुद दिनांक २९/१२/२०१९ रोजीच्या घटनेबाबत देखील मी तपास केला नाही. सदर घटनेबाबत फिर्याद देण्याकरीता उशीर का झाला याबाबत मी तपास केला नाही. फिर्यादीचे पती मुंबईला गेले व परत आले याबाबत मी तपास केला नाही. मला घटनास्थळाचा घर क्रमांक लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळा शेजारी इतर लोकांची घरे देखील आहेत. मी घटनास्थळा शेजारी राहणा–या लोकांचे जबाब नोंदविले नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या साक्षी सरतपासात आरोपी विरुध्द सांगितलेला संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी गुन्हा केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी

विरुध्द खोटे दोषारोप पत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

दिनांक:- १२/०२/२०२६.

श्रवणोत्तर स्वीकृत

VIVEK VITHALRAO NIVGHEKAR
Digitally signed by VIVEK VITHALRAO NIVGHEKAR
Date: 2026.02.12 17:53:15 +0530

(व्ही. व्ही. निवघेकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग तुळजापूर